मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर
जुना मुंबई पुणे रोड, आनंद कोळीवाडा मुंब्रा, ठाणे
पिन ४००६१२ दुरध्वनी क्रमांक ०२२-२५४६२३५५
e-mail cp.thane.mumbra@mahapolice.gov.in

प्रेसनोट

मुंब्रा पोलीस स्टेशन एन.डी.पी.एस पथकाची धडक कारवाई, आरोपीच्या ताब्यातुन ०१ किलो ३८४ ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ जप्त

----------OOOOOOOO----------

मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर ये हद्दीत अंमली पदार्थांची विकी व सेवन करणा-यांवर कठोर कारवाई करणेबाबत आदेश मा.पोलीस आयुक्त सो,मा.पो.उप आयुक्त सो,यांनी मुंब्रा पोलीस स्टेशनचे एन.डी.पी.एस पथकातील अधिकारी व अंमलदार यांना आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सपोनि/ढगे व एन.डी.पी.एस पथक असे मुंब्रा पोलीस स्टेशन गस्त करीत असताना झेंडेवाला बाबा, इराणी वस्ती येथे एक इसम संशयितरित्या व संशयित हालचाल करताना दिसुन आल्याने एन.डी.पी.एस पथकाने त्यास पळुन जाण्याची संधी न देता ताब्यात घेतले असता इसम नामे **साहिल सिराज शेख, वय-१८ वर्षे** याने पोलीस पथकाने विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे न दिल्याने वरीलप्रमाणे इसमाची अंगझडती घेण्यात आली असता इसम नामे **साहिल सिराज शेख, वय-१८ वर्षे याचे ताब्यात** रु. २८,२२९/-किंमतीचा **०१ किलो ३८४ ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ** मिळुन आल्याने त्याचेविरोधात गु.र.क. ॥ १९५२/२०२६, एन.डी.पी.एस ॲक्ट कलम ८(क), २०(ब), २९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येवुन आरोपी अटक करण्यात आली आहे.

मुंब्रा एन.डी.पी.एस पथकामार्फत सन-२०२६ मध्ये अंमली पदार्थांची विकी करणा-या **३९ आरोपींविरोधात** गुन्हे नोंद करण्यात आले असुन आरोपी यांचे ताब्यातुन सुमारे **३२ करोड किंमतीचा अंमली पदार्थ मुद्देमाल** जप्त करण्यात आला आहे. तसेच मुंब्रा पोलीस स्टेशन हद्दीत विविध भागात सोसायटीच्या आवारात, रिक्षामध्ये, निर्जण स्थळी,रिक्षा पार्किंगमध्ये, बायपास रोडवर, मोकळे मैदानात तसेच विविध ठिकाणी गांजा तसेच इतर तत्सम अंमली पदार्थांचे सेवन करणा-या ६३५ इसमांवर कारवाई करण्यात आली असुन त्यांचेविरोधात एन.डी.पी.एस कायदयांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच पथकामार्फत सिगारेट व तंबाखुजन्य पदार्थ सेवन करणा-या ९१२ इसमांविरोधातदेखील कारवाई करण्यात आली आहे.

मुंब्रा पोलीस स्टेशन,ठाणे शहर एन.डी.पी.एस पथकामार्फत अंमली पदार्थांची विकी व सेवन करणा-या इसमांवर यापुढे देखील अशाचप्रकारे कठोर कारवाई करण्यात येणार असुन नागरिकांना याद्वारे मुंब्रा नशामुक्त होणेकामी अंमली पदार्थ (ड्रग्ज) संदर्भाने कोणतीही माहिती असल्यास खालील दिलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

सपोनि/सचिन ढगे मो.क.८१०८४८४००० , पोउपनि/रामकृष्ण दळवी मो.क.९६५७१२५९९० व पोलीस ठाणे अंमलदार ०२२-२५४६२३५५

नमुद कारवाई मा.पोलिस आयुक्त ठाणे शहर श्री. आशुतोष डुंबरे, मा.पोलिस सह आयुक्त श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, मा.अप्पर पोलिस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग श्री.अशोक दुधे, मा.पोलिस उप आयुक्त परिमंडळ-०१ श्री.बाळासाहेब पाटील,सहा.पोलिस आयुक्त सो,कळवा विभाग श्री.संकेत देवळेकर, **वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री.गणेश जवादवाड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. शरद कुंभार पोलीस निरीक्षक(प्रशासन), श्री. प्रशांत पाटील पोलीस निरीक्षक(गुन्हे),श्रीमती. वृषाली पवार पोलीस निरीक्षक (कायदा व सुव्यवस्था), पोनि/गायकवाड, सपोनि/ढगे, पोउपनि/दळवी, पोहवा/३७३५ शेगर, पोशि/७७२५ थोरवे, पोशि/७६५५ पाटील, पोशि/४६१९ वर्पे, पोशि/२९३५ सातपुते यांनी केलेली आहे.**

:: आवाहन ::

मुंब्रा पोलीस स्टेशन च्या वतीने मुंब्रा व दिवा येथील सर्व नागरिकांना आव्हान करण्यात येते की, अंमली पदार्थाचे सहमुळ उच्चाटन करण्यासाठी आपल्या परिसरामध्ये कोणीही कोणत्याही प्रकारचे अंमली पदार्थ विकी अथवा सेवन करत असेल तर त्याची माहिती मुंब्रा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री.गणेश जवादवाड व एन.डी.पी.एस पथकाचे सपोनि/सचिन ढगे मो.क.८१०८४८४००० व पोउपनि रामकृष्ण दळवी मो.नं. ९६५७१२५९९० यांना गोपनीय माहिती देउन मुंब्रा पोलीस स्टेशन ला सहकार्य करावे ही विनंती.